राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

तक्रार क्रमांक-५७६/२०२५/अहिल्यानगर व्दितीय अपील क्र.- ७१४९/२०२२/अहिल्यानगर		
अ.क्र.	तपशील	
१.	श्री. बाळासाहेब कारभारी सानप, मु.पो.लोणी बु.,ता.राहाता जि. अहिल्यानगर ४१३७३६	तक्रारदार
	विरूद्ध	
१.	कक्ष अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, राहाता, ता.राहाता, जि.अहिल्यानगर	उत्तरवादी क्र.१
२.	गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, ता.राहाता.जि.अहिल्यानगर	उत्तरवादी क्र.२

(निर्णय दिनांक ०१/०७/२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक २९/१०/२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) नुसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.आयोगाने व्दितीय अपील क्रमांक ७१४९/२०२२/ अहिल्यानगर संदर्भात दिनांक २१/०५/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक २९/०८/२०२५ अन्वये आदेश पारीत केलेला आहे. तथापि, सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, राहाता, ता.राहाता, जि.अहिल्यानगर यांनी अपूर्ण,मोघम व दिशाभूल करणारी माहिती पुरविली असून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत परीपूर्ण माहिती पुरविली नसल्याची तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तुत प्रकरणी आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरुन असे स्पष्ट होते की, आयोगाने व्दितीय अपील क्रमांक ७१४९/२०२२/ अहिल्यानगर संदर्भात दिनांक २१/०५/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक २९/०८/२०२५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर तक्रारदार यांना पुरविणे अभिप्रेत होते.मात्र तसे केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तूत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, राहाता, ता.राहाता, जि.अहिल्यानगर यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने व्दितीय अपील क्रमांक ७१४९/२०२२/ अहिल्यानगर संदर्भात दिनांक २९/०८/२०२५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी. उपमुख्य कार्यकारी अधिकारी-पंचायत, जिल्हा परीषद कार्यालय, अहिल्यानगर, ता.जि.अहिल्यानगर यांना आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त निर्देशासह तक्रार क्र. ५७६/२०२५/अहिल्यानगर अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

प्र२।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

तक्रार क्रमांक- ५७६/२०२५/अहिल्यानगर /जावक क्र. ५५१० दिनांक- ०६/१०/२०२५

प्रत- आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद कार्यालय, अहिल्यानगर, ता.जि.अहिल्यानगर

२.उपमुख्य कार्यकारी अधिकारी-पंचायत,जिल्हा परीषद कार्यालय,अहिल्यानगर, जि.अहिल्यानगर

३.निवडनस्ती